**वाचा** :- जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म्.राज्य) पुणे यांचेकडील परिपत्रक क्र.राभूअआका- ४ /प्र.क्र.१६/डेटा दुरुस्ती आज्ञावली/१३ पुणे दिनांक २०/५/२०१३

---

क्रमांक .रा.भू.अ.आ.का-४/प्र.क्र. ३ /२०१४
जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख ( म.रा.)पुणे यांचे कार्यालय
पुणे दिनांकः- ३१ /१/२०१४

# परिपत्रक

**विषय :- डाटा दुरुस्ती आज्ञावली**
**युनिकोड रुपांतरीत ७/१२ डेटा दुरुस्तीची सांख्यिकी माहिती संधारण करणेबाबत.**

ई-महाभूमि तथा राष्ट्रीय भूमि अभिलेख आधुनिकीरण कार्यक्रम अंतर्गत जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख ( महाराष्ट्र राज्य ),पुणे यांनी राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र,पुणे यांचे मार्फत विकसीत केलेल्या ई-चावडी व ई-फेरफार या आज्ञावलींची अंमलबजावणी संपूर्ण महाराष्ट्र राज्यात करावयाची आहे.त्यासाठी करावयाची पूर्व तयारी बाबतच्या सविस्तर सूचना वेळोवेळी परिपत्रकाव्दारे निर्गमित केलेल्या आहेत. संगणकीकृत ७/१२ चा डाटा युनिकोडमध्ये रुपांतरीत झालेनंतर मुळ डाटा एन्ट्री वेळी झालेल्या चुकांमुळे ७/१२ वरील एकूण क्षेत्रांशी धारकांचे नांवासमोर नमूद केलेले क्षेत्र तसेच ८ अ वरील क्षेत्राचा मेळ न बसणे, ७/१२ व ८ अ वरील धारकांच्या नावात तफावत असणे, धारकांच्या नोंदीचे इतर अधिकारातील नोंदीचे फेरफार क्रमांक नमूद नसणे,चुकीच्या खातेप्रकार निवडने अशा त्रुटी संगणकीकृत डाटा मध्ये निर्माण झाल्या आहेत. सदर चुका दुरुस्त करुन डाटा दुरुस्त करणेसाठी राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र, पुणे कार्यालयाने डाटा दुरुस्ती आज्ञावली विकसीत करुन राज्यातील सर्व तहसिल कार्यालयांना पुरविली आहे. या आज्ञावलीचा वापराव्दारे ७/१२ च्या संगणकीकृत डाटा मधील त्रुटी दर्शविणारे वेगवेगळे १५ अहवाल तयार होतात तसेच या त्रुटी दूर करणेची सुविधा आज्ञावलीमध्ये देणेत आली आहे.त्यानुसार संपूर्ण राज्यात दुरुस्तीची कार्यवाही सुरु आहे.तथापी या आज्ञावलीचा वापर करुन संगणकीकृत ७/१२ मध्ये किती त्रुटी आढळून आल्या व त्या मधील किती दुरुस्त्या करणेत आल्या याची माहिती ठेवणे आवश्यक आहे. ज्यायोगे डाटा मधील त्रुटीचे निराकारण होईल सबब प्रत्येक जिल्हयाने तालुकानिहाय संकलीत करून दरमहाचे एमआयएस सोबत प्रपत्र चे नमून्यात इकडील कार्यालयास पाठविणेची आहे.

**( चंद्रकांत दळवी )**
**जमाबंदी आयुक्त आणि संचालक**
**भूमि अभिलेख (म.राज्य.) पुणे**

D:\रा.भु.अ.आ.का\परिपत्रक\संख्यांकी माहीती-.odt3

प्रत : अप्पर मुख्य सचिव महसुल, महसुल व वन विभाग, मंत्रालय मुंबई, यांना माहितीसाठी.

प्रत : विभागीय आयुक्त (सर्व) यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत : जिल्हाधिकारी (सर्व) यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत : राज्य सुचना विज्ञान अधिकारी, मुंबई यांना माहितीसाठी.

प्रत : उपसंचालक भुमि अभिलेख,संलग्न जमाबंदी आयुक्त (सर्वसाधारण, भूमापन,नागरी भूमापन, एकत्रीकरण, रा.भु.अ.आ.का)पुणे यांना माहिती साठी.

प्रत : उपसंचालक भुमि अभिलेख (सर्व) यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत : वरीष्ठ तांत्रिक संचालक, राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे यांना माहिती व कार्यवाहीसाठी .

प्रत: डिस्ट्रीक्ट डोमेन एक्सपर्ट (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

प्रत: जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी (सर्व ) यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

प्रत : उपविभागीय अधिकारी (सर्व) यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत : तहसिलदार (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

## प्रपत्र

### ई-फेरफार आज्ञावली :- डाटा दुरुस्ती आज्ञावली वापरून मेळ बसलेल्या व मेळ न बसलेल्या त्रुटींची सांख्यिकी माहिती

जिल्हा :- -----------

| अ.न. | तालूका | त्रुटीं प्रकार | अहवाल १ | अहवाल २ | अहवाल ३ | अहवाल ४ | अहवाल ५ | अहवाल ६ | अहवाल ७ | अहवाल ८ | अहवाल ९ | अहवाल १० | अहवाल ११ | अहवाल १२ | अहवाल १३ | अहवाल १४ | अहवाल १५ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | गाव नमुना ७ वरील एकुण क्षेत्र व ७/१२ वरील खात्यांच्या एकुण क्षेत्रांचा फरक | ७/१२ व ८ अ मधील फरक | गाव नमुना १ व ७ मधील क्षेत्राचा फरक | गाव नमुना ७ वरील एकुण क्षेत्र व जिरायत, बागायत इत्यादी क्षेत्र यांचा मेळ न बसलेले सर्व्हे /गट क्रमांक | ७/१२ व खाता रजिस्टर मधील खात्या वरील नावांचा फरक | चुकीच्या पद्धतीने भरलेली खातेदारांची नावे | खाता रजिस्टर मध्ये चुकीचे निवडलेले खाता प्रकार | फेरफार क्रमांक नसलेल्या कब्जेदारांची नावे | चुकीच्या पद्धतीने भरलेले सर्व्हे / गट क्रमांक | सोळा आणेहुन जास्त आणेवारी असलेले सर्व्हे / गट क्रमांक | इतर अधीकारात नोंदीचा प्रकार निवडलेला नाही | फेरफार क्रमांक नसलेल्या इतर अधीकारांच्या नोंदी | मुधारणा पद्धतीसाठी नोंदीचा प्रकार निवडलेला नाही | गाव नमूना ७ भरलेला आहे पण १२ भरलेला नाही | मास्टर टेबलमध्ये आवश्यक असणा -या कमाल पात्र माहीतीची संख्या | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ |
| | | मेळ बसलेल्या | | | | | | | | | | | | | | | | |
| | | मेळ न बसलेल्या | | | | | | | | | | | | | | | | |
| | | एकूण | | | | | | | | | | | | | | | | |

( चंद्रकांत दळवी )
जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख (म.राज्य.) पुणे